भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४६४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/०६/२०१७

**१) बेकायदेशीर रित्या शेतात करंट लावुन २ बकऱ्या, १ कुर्ता यांचे मरणास व १ इसमास जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद .:–**

दिनांक २२/०६/२०१७ चे ११.०० वा. दर. यातील आरोपीने बेकादेशीर रित्या आपले शेतात जंगली जनावरापासुन शेतीचे नुकसान होवु नये म्हणुन करंट लावले असता ते करंट लागुन २ बकऱ्या व १ कुर्ता मरण पावला असुन इसम शिवशंकर मंगरु डोबणी ऊईके वय ४५ रा. पिपरा यास जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने व नुकसान झाल्याने फिर्यादी नंदलाल मोहनराव बडवाईक वय ४७ वर्ष, रा. पिपरा पोलीस पाटील यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४२९,३३८,४२७ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कंळबे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**२) घराचे मागील खोलीचा दार उघडुन बेडरुम मधील गोदरजे कपाटा मधील नगदी पैसे व लाकडी कपाटातील सोन्या चांदीचे दागीण्याची चोरी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २१/०६/२०१७ चे २३.०० वा. पासुन ते २२/०६/२०१७ चे ०४.०० वा . दर. यातील फिर्यादी गिरीधर महादेव कापगते वय ६३ वर्ष, रा. कटंगधरा/ सासरा हे त्याचे राहते घरी समोरचे हॉल मध्ये झोपले असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन घराचे मागचा स्वयपांक खोलीचा बंद दार उघडुन घरात प्रवेश करुन बेडरुम मधील असलेल्या गोदरेज कपाटाला चाबीने उघडुन कपाटातील नगदी ५,०००/–रु. चोरुन नेले तसेच लाकडी कपाटाचा कोंडा वाकवुन ताला काडुन त्यामध्ये असलेले कंठी मण्याची सोन्याची पोत २ नग, १ लॉकेट असलेले वजन ३२ ग्रॅम, व दुसरी लॉकेट असलेली ३५ ग्रॅम, एकुण वजन ६७ ग्रॅम, ३ नग सोन्याच्या अंगठया खडेवाली ५ ग्रॅम, १ बदाम छाप अंगठी ४ ग्रॅम, ४ ग्रॅम, खडेवाली एकुण १३ ग्रॅम, ३ नग सोन्याचे गोप, बारीक सोन्याचे तारापासुन तयार केलेले एकुण ४० ग्रॅम, १ जोड सोन्याच्या बांगडया ३० ग्रॅम, ३ जोड कानातील बिऱ्या सोन्याचे वजन १० ग्रॅम, चांदीच्या तोरडया ६७ ग्रॅम व चांदीचे जोडवे २ जोड २० ग्रॅम एकुण ८७ ग्रॅम, २,७५,५००/–रु. चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. गायकवाड पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) टवेरा गाडी चालकांच्या निष्काळजीपणामुळे अनोळखी पायी जाणाऱ्या इसमास धडक मारुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद .:–**

दिनांक २२/०६/२०१७ चे १५.३० वा. दर. यातील अज्ञात वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन एनएच ०६ रोडने जाणाऱ्या अनोळखी पादचारी इसम वय अंदाजे ५० वर्ष वयोगटातील यास धडक मारुन गंभिर जखमी करुन त्यास उपचारा करीता उपजिल्हा रुग्णालय साकोली येथे नेले असता डॉक्टरने तपासुन मृत घोषीत करुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने डॉक्टरी मेमो वरुन सरतर्फे फिर्यादी पोहवा. मडावी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भांदवि. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनि. गायकवाड पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) संगनमत करुन दारु विक्रीचे कारणावरुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक २१/०६/२०१७ चे २०.३० वा. दर. यातील फिर्यादी ही गावचे व्यसन मुक्तीचे पदाधिकाऱ्यासोबत सुधीर माटे हा आपले घरी दारु विक्री करतो म्हणुन त्याचे घराचे बाजुला लपले असते यातील आरोपी क्र. १ ने टॉर्च मारले वरुन त्यास आमचे वर टॉर्च कशाला मारतोस असे बोलले असता आरोपीतांनी तुम्ही रात्र भर फिरता तुम्ही वेश्या आहात नंग्या आहात तुम्ही माटेच्या घरात घुसा अश्या अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन आपले घरी गेला व आरोपी क्र. २ व ३ हे घराचे बाहेर निघुन संगनमत करुन फिर्यादी हीचे सोबत असलेल्या बाया मानसांना अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन त्यांना मारण्यास धावुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व ओपी गोंड उमरी आक्ररन्स क्र. १४/१७ यांचे रिपोर्ट वरुन सरतर्फे फिर्यादी पोहवा. चांदेवार पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन जुण्या वादावरुन महिलेचा विनयभंग करुन धमकी दिल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक २१/०६/२०१७ चे १८.४५ वा. दर. यातील फिर्यादी ही आपले शेतावर एकटी हजर असतांनी यातील आरोपीतांनी संगनमत करुन जुण्या वैमनस्या वरुन फिर्यादीचे शेतामध्ये जावुन आरोपी क्र. १ ने तु माझेमुलांचे विरुध्द हायकोर्टात केस टाकली तरी आम्ही जिकलो असे म्हणाला असता फिर्यादीने तुम्ही केस जिंकल्या तर येथे कश्याला आले असे बोलली असता आरोपी क्र. १ ने तुझा बदला घेण्यासाठी आलो असे बोलुन आरोपी क्र. ३ नी फिर्यादीचे दोन्ही हात पकडुन आरोपी क्र. २ ने फिर्यादीचे तोंडावर रुमाल बांधुन तिचा गळा दाबुन अंगातील कपडे फाडुन तिचा विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४४७,३५४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**६) ट्रॅक चालकांच्या निष्काळजीपणामुळे ट्रॅक्टरला धडक मारुन ट्रॅक्टरमधील पाच इसमांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक २१/०६/२०१७ चे २१.३० वा. दर. यातील फिर्यादी अजय सहादेव आंबेडारे वय ३० वर्ष, रा. डोडमाझरी टेकेपार हा टॅक्टर क्र. एमएच ३६ डी ८९३२ चे ट्रॅक्टर चालकासह ट्रॅक्टरवर बसुन भंडारा कडुन टेकेपार कडे एनएच ०६ रोडने वैनगंगा पुलीया वरुन जात असता विरुध्द दिशेने येणाऱ्या आरोपी ट्रक चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने व भरधाव वेगाने चालवुन ट्रॅक्टर ला धडक मारुन ट्रॅक्टरचे टॉली मध्ये फिर्यादी व सोबत बसलेल्या चार मंजुरांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७, भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चाबुकस्वार पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**७) अवैध दारु अडयावर धाडी . :—**

दिनांक २२/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा,जवाहरनगर,सिहोरा,आंधळगाव येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ४५ लिटर हातभट्टी दारु, किंमती ३२००/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

सपोनी. अे.टी. सुनगार
नियंत्रण कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र ९८२३१२३३३६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.